IMPACT FACTOR (SJIF) 2021-7.380 ISSN 2319-4766

An International Peer Reviewed & Refereed Journal


# SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

APRIL - JUNE,2021, VOL- 10, ISSUE-55

## राष्ट्रीय चर्चासत्र विशेषांक, मराठी विभाग, लोकमान्य महाविद्यालय, वरोरा, (जि. चंद्रपूर) महा.

मुख्य-संपादक
डॉ. सुबोध कुमार सिंह
प्राचार्य

संपादक
डॉ. जयश्री शास्त्री
मराठी विभाग प्रमुख



| | | |
|---|---|---|
| 11 | समकालीन ग्रामीण वास्तवाचे प्रभावी चित्रण : 'पाडा'<br>*प्रा. डॉ. विजयेंद्र विश्वनाथ पाटील* | 76-80 |
| 12 | समकालीन स्त्रीवादी साहित्यप्रवाह<br>*प्रा. सौ. रश्मी रमेश देसाई* | 81-87 |
| 13 | समकालीन मराठी ग्रामीण कविता<br>*प्रा. डा. राजकुमार मुसणे* | 88-102 |
| 14 | केशव मेश्राम-दलित मुक्ती लढ्यातील विद्रोही कवी<br>*डॉ. अशोक विठ्ठलराव वाहुरवाघ* | 103-105 |
| 15 | समकालीन आदिवासी कवितेतील संवेदना<br>*प्रा. डॉ. प्रकाश पी. वट्टी* | 106-114 |
| 16 | समकालीन मराठी कादंबरी : निळया डोळयाची मुलगी<br>*डॉ. अर्चना काटकर- सोनवणे* | 115-118 |
| 17 | जागतिकीकरणात समकालीन मराठी कवितेचे स्वरूप<br>*डॉ. नरेंद्र तुकडोजी आरेकर* | 119-128 |
| 18 | 'कोरकोंडा' कादंबरी — कायद्याच्या वाटेवरून होणारा संघर्ष<br>*प्रा. डॉ. अरुण लाडे* | 129-134 |
| 19 | 'पोटमारा' या कादंबरीतील समकालीन जाणिवा<br>*प्रा. प्रदिप केशव चापले* | 135-143 |
| 20 | समकालीन मराठी नव कवींची ग्रामीण कविता<br>*प्रा. डॉ. अतुल नारायन चौरे* | 144-151 |
| 21 | **रेखा बैजल आणि माधुरी शानभाग यांची विज्ञानकथा**<br>*प्रा. रंजिता वीरकर* | 152-158 |
| 22 | 'आलोक' समकालीन दीर्घकथेचा यशस्वी अविष्कार<br>*प्रा. विकास शंकर पाटील* | 159-163 |
| 23 | समकालीन मराठी साहित्याचे स्वरूप आणि संकल्पना<br>*प्रा. डॉ. विशाल प्रकाश लिंगायत* | 164-168 |
| 24 | आदिवासी आत्मकथने स्वरूप व आकलन<br>*डॉ. विठ्ठल केदारी* | 169-173 |

Scholarly Research Journal For Interdisciplinary Studies SJIF2021=7.380 ISSN: 2319-4766

# समकालीन मराठी साहित्याचे स्वरूप आणि संकल्पना

**प्रा. डॉ. विशाल प्रकाश लिंगायत**

*सहाय्यक प्राध्यापक, ( मराठी विभाग) श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय, बार्शी. ता. बार्शी. जि. सोलापूर. महाराष्ट्र. ४१३४०१. मो. नंबर- ७५८८०२०२९०*

*ई-मेल - vishallingayat28@gmail.com*

**प्रस्तावना :-**

मराठी साहित्यात साधारणपणे १९६० नंतरच्या साहित्याला 'समकालीन' ही संज्ञा रुढ आहे. तत्पूर्वी अकराव्या शतकापासून अठराव्या शतकापर्यंतच्या कालखंडातील साहित्याला 'प्राचीन साहित्य' असे म्हटले जाते. इ. स. १८१८ मध्ये मराठी राज्याचा अस्त झाला व पुढे इंग्रजी राजवट सुरू झाली. तिथपासून १८८५ पर्यंतच्या काळाला 'अव्वल इंग्रजी कालखंड' असे म्हटले गेले ; तर १८८५ ते १९२० या कालखंडातील साहित्याला 'अर्वाचीन' किंवा 'आधुनिक साहित्य' असे म्हटले गेले. परंतु इ. स. १९२० पासून १९४५ पर्यंतचा कालखंड हा खऱ्या अर्थाने 'आधुनिक साहित्याचा काळ' म्हणून ओळखला जातो. कारण याच कालखंडात 'रविकिरण मंडळाचा उदय' झालेला दिसतो. त्यामुळे १८८५ ते १९२० आणि १९२० ते १९४५ हे दोनही कालखंड 'अर्वाचीन' अथवा 'आधुनिक साहित्याचे कालखंड' म्हणून ओळखले जातात. १९४५ पासून पुढच्या काळातल्या साहित्याला 'समकालीन साहित्य' असे म्हटले जाते. तसेच या काळातल्या साहित्याला 'नवसाहित्य' असेही संबोधले जाते. त्यामुळे १९४५ ते १९६० या कालखंडातल्या साहित्याचा 'नवसाहित्य' आणि १९६० नंतरच्या साहित्याचा 'साठोत्तरी कालखंड' म्हणजेच 'नवसाहित्योत्तर कालखंड' म्हणूनही हा काळ ओळखला जातो. म्हणजेच 'समकालीन साहित्य' असे या कालखंडाला म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही.

'समकालीन साहित्य' म्हणजे जे साहित्य आपल्या काळाबरोबर आहे, ज्या काळात ते निर्माण झाले त्या काळाचे प्रतिबिंब त्यात आहे ; त्या काळातील विचार, जाणिवा, भावना, मते ज्या साहित्यातून व्यक्त होतात असे साहित्य. हे साहित्य आपल्या काळाशी आणि त्या काळातील परिस्थितीशी जवळचे नाते सांगते. या काळात घडलेल्या घटनांचे पडसाद या साहित्यातून उमटतात. "स्वातंत्र्योत्तर काळातील ग्रामीण साहित्य धारेने सांस्कृतिक जे-जे परिवर्तन आहे, त्याचे जिवंत दर्शन मराठी समाजाला घडविले." १. मानवी कृती. मानवी स्वभाव, मानसिकता आणि मानवी वर्तन यातून ही संस्कृती घडली आहे. त्यातूनच वेगळ्या जाणिवा निर्माण होतात. वेगळ्या जाणिवांमधून वेगळे संवेदन आणि वेगळ्या संवेदनेतून वेगळे साहित्य निर्माण झाले आहे. जीवनाचे परिमाण वेगळे असल्याने साहित्यातून व्यक्त होणारे जीवनही वेगळेच आहे. 'समकालीन' हा कालवाचक शब्द आहे. सम म्हणजे समान, समांतर, आपल्यासोबत जे साहित्य असते, आपल्या काळासोबत असते, ज्या काळात ते निर्माण होत असते. त्या काळातील समाजाचे प्रतिबिंब त्यात पडलेले असते. त्या काळात ज्या घटना घडत असतात, ज्या विचारप्रणाली प्रभावी असतात, त्या काळातील

Scholarly Research Journal For Interdisciplinary Studies SJIF2021=7.380 ISSN: 2319-4766

कितीतरी ग्रामीण लेखक, कवी आज लिहीत आहेत. या लेखकांचे लेखन एकूण परंपरांचा आणि समाजव्यवस्थेचा अर्थ शोधू पाहत आहे. १९७५ नंतरच्या लेखकांमध्ये भास्कर चंदनशिव हे एक महत्त्वाचे लेखक आहेत. शेतीचे दहा दिशांनी होणारे शोषण ते एक जीवनदृष्टी घेऊन प्रकट करतात. म्हणूनच त्यांच्या कथांमधून ग्राम विद्रोहाची जाणीव दिसते. तसेच ग्रामीण भागातील दलित - दलितेतर ताणतणावांचे चित्रणही येते. यादृष्टीने त्यांची 'पाणी' ही कथा अतिशय अर्थवाही स्वरूपाची झाली आहे. तसेच त्यांची 'लाल चिखल' सारखी कथा यासंदर्भात पाहता येईल. 'अंगार माती', 'बिरडं', 'नवी वारूळं' हे त्यांचे कथासंग्रह जीवनाचा एक नवा वेगळाच अर्थ उलगडून दाखवतात. त्यामुळे या सर्व साहित्याच्या नवीन प्रवाहाला 'समकालीन साहित्य' असे म्हटले गेले तर ते चुकीचे ठरत नाही.

**संदर्भ टीपा :-**


1) प्रा. रा. ग. जाधव, 'मराठी वाङ्मय : स्वातंत्र्योत्तर संदर्भ, प्रतिमा प्रकाशन- पुणे १९९८, प्र. आ., पृ.- २६

2) प्रा. लिंबाळे शरणकुमार, 'साठोत्तरी मराठी साहित्यातील प्रवाह', दिलीपराज प्रकाशन- पुणे, २००७, प्र.आ., पृ.- १५२

3) प्रा. गो. मा. पवार / म. द. हातकणंगलेकर, 'मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप', (१९५०- १९७५), पॉप्युलर प्रकाशन- मुंबई, १९०७, प्र.आ. पृ.- ४४

4) प्रा. सु. श्री. पांढरीपाडे, 'साहित्य : स्वरूप संदर्भ आणि सौंदर्य, प्रतिमा प्रकाशन- पुणे, १९८५ प्र.आ., पृ.- २१

5) डॉ. यशवंते राजीव, 'ग्रामीण साहित्य चळवळ : प्रेरणा व स्वरूप', स्वरूप प्रकाशन- औरंगाबाद, प्र.आ., पृ.-१२

6) सरकटे सदाशिव, '१९८० नंतरची स्त्रीवादी कविता', चिन्मय प्रकाशन- औरंगाबाद, २०११, प्र.आ., पृ.- १०६

7) प्रा. लिंबाळे शरणकुमार, उ. नि. -२, पृ.-१७०

8) प्रा. रा. ग. जाधव (संपा), 'मराठी वाङ्मयाचा इतिहास', खंड सातवा, भाग पहिला, महाराष्ट्र साहित्य परिषद- पुणे २००९, प्र.आ., पृ.-२६८

9) जाधव मनोहर (संपा), 'समीक्षेतील नव्या संकल्पना', स्वरूप प्रकाशन- औरंगाबाद, २००१, प्र.आ., पृ.- १२१

10) डॉ. लुलेकर प्रल्हाद, 'साहित्याचे वर्तन आणि वर्तमान', साकेत प्रकाशन- औरंगाबाद, २००८, प्र.आ., पृ.- ८

11) प्रा. रा. ग. जाधव, उ. नि. १, पृ. – २७